RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक २७] सोमवार, ऑगस्ट १०, २०२६/श्रावण १९, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२.**—महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम. .. .. .. .. .. | पृष्ठे १-२ |

दिनांक ३ ऑगस्ट, २०२६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सुप्रिया धावरे,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— २०२२ चा महा. ३५.





Part IV Ext. 63 (HB 977).indd 1 11/08/2026 01:15:33

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम १९ ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १९ मध्ये, पोट-कलम (४) मधील खंड (च) मध्ये, "महाराष्ट्र विद्यापीठे लेखा संहितेनुसार" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेनुसार" हा मजकूर दाखल करण्यात येईल. २०२२ चा महा. ३५.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४३ ची सुधारणा. **३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४३ मध्ये, पोट-कलम (ढ) मधील, "कलम ६० च्या पोट-कलम (६)" या मजकुराऐवजी, "कलम ६० च्या पोट-कलम (६) व (७)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४४ ची सुधारणा. **४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ मध्ये, पोट-कलम (९) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(१०) पूर्वगामी पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, विद्यापीठावर बंधनकारक असतील असे, एकरूप परिनियम विहित करण्याचा अधिकार असेल.".

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५६ ची सुधारणा. **५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ मध्ये, खंड (चार) मधील, "खरेदी व विक्री समिती" या मजकुराऐवजी, "खरेदी समिती" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५९ ची सुधारणा. **६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५९ मध्ये, पोट-कलम (५) मधील, खंड (ङ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(ङ) विद्यापीठाच्या कामांसाठी अनुभव सिद्ध व गुणवत्ता असलेले तीन ते पाच वास्तुविशारद आणि इतर विशेषीकृत सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, संरचना सल्लागार, कार्यकारी अभिकरणे यांची एक नामिका तयार करील आणि त्यास नियमक मंडळाकडून मान्यता घेईल;".

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ६० ची सुधारणा. **७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६० मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईलः-

"(१) विद्यापीठाच्या सर्व खरेदींशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी हाताळण्यासाठी एक खरेदी समिती असेल;".

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ७६ ची सुधारणा. **८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७६ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "लेखा संहितेचे" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेचे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.